# शेतकऱ्यांचा छळ करून त्यांच्या जमिनी लाटल्या : दमानिया

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उप संपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड- महाराष्ट्र • बीड, बुधवार, दि. 2 एप्रिल 2025 | • अंक क्र. 306 | • वर्षे 2 रे | • मुल्य 3 रुपये | • पृष्ठे 4






पुढे त्यांनी पाच वर्षापूर्वीची आठवणी देखील सांगितली, जेव्हा पंकजा मुंडेविरोधात फाईल घेऊन हे लोक माझ्याकडे आले होते, तेव्हा त्यात घनवटचा देखील समावेश आहे. अंजली दमानिया पुढे बोलताना म्हणाल्या की, राजेंद्र घनवट कोण आहेत तर जसे कराड धनंजय मुंडेंच्या जवळ होते तसेच घनवट हे देखील मुंडेंच्या जवळचे आहेत.

## पंकजा मुंडे यांचा विषय मांडावा

धनंजय मुंडे पाच वर्षापूर्वी तेजस ठक्कर नावाच्या माणसाला सोबत घेऊन आले होते. त्यावेळी त्यांच्याकडे कागदांचा मोठा गठ्ठा होता. त्यामधून मी पंकजा मुंडे यांचा विषय मांडावा असा आग्रह त्यांनी केला. मात्र, मी धनंजय मुंडे यांना सांगितले की मी असं कुणी काही दिलेल्या कागदांवर काम करत नाही. पण मी बीडचा विषय लावून धरला तेव्हा राजेंद्र घनवट यांचे नाव एका चॅनलच्या डिबेटमध्ये घेतले होते. त्यानंतर मोठ्या प्रमाणात लोकांनी माझ्याशी संपर्क केला", असेही अंजली दमानियांनी म्हटले.

## पॉवर ऑफ अटर्नी

तुम्हाला हवे तेवढे मानहानीचे, हवे त्या केस करा. तुमच्या प्रत्येक केसची माहिती माझ्याकडे आहे, असे आव्हान दमानिया यांनी पोपटलाल घनवट यांना दिले. संजय उर्फ आनंद चव्हाण नावाचा एक व्यक्ती आहे. त्याच्या नावावर सगळ्या पॉवर ऑफ अटर्नी घेतल्या जातात. त्याचा कसा गैरवापर होतो, याचाही माहिती आपल्याकडे असल्याचा दावा दमानियांनी केला आहे.

## यंत्रणा काहीच बोलत नाही

अंजली दमानिया म्हणाल्या की, घनवट आणि धनंजय मुंडे यांचा कसा संबंध आहे, त्यांचे व्यवहार कसे आहेत, आर्थिक व्यवहार किती आहेत याची चौकशी झाली पाहिजे, अशी माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी आहे. 2004 पासून हा सर्व प्रकार सुरू आहेत. त्यांच्याविरोधात यंत्रणा काहीच बोलत नाही कारण त्यांच्या पाठिशी धनंजय मुंडेंसारखे राजकारणी आहेत. घनवट आणि मुंडे हे थेट पार्टनर आहेत, कुठली पोलिस यंत्रणा असे असल्यावर त्यांच्यावर कारवाई करेल.

# काय आहे राजेंद्र घनवट प्रकरण ? अंजली दमानियांचा गौप्यस्फोट

**मुंबई वृत्तसंस्था**

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काल पत्रकार परिषद घेत धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे राजेंद्र घनवट यांचा घोटाळा बाहेर काढला. घनवट यांनी शेतकऱ्यांना धमकी देत राजकारणी लोकांच्या मदतीने जमिनी लाटल्या असल्याचा आरोप दमानिया यांनी केला. तसेच धनंजय मुंडे यांच्याबाबत अंजली दमानिया यांनी आणखी एक गौप्यस्फोट केला. दमानिया म्हणाल्या की, "राजेंद्र घनवट हे धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय आहेत. राजेंद्र घनवट आणि धनंजय मुंडे यांचे फोटो आहेत. व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीयल कंपनीबद्दल म्हणजेच जी फ्लाय ॲश महाजेनको कडून घ्यायची आणि मोठ्या प्रमाणावर विकायची. ज्याबाबत मी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्या व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीमध्ये संचालक पदावर ते दोनच आहेत एक आहेत राजश्री धनंजय मुंडे दुसरे आहेत राजेंद्र घनवट", अशी माहिती अंजली दमानियांनी पत्रकार परिषदेत दिली.
पत्रकार परिषदेत दोघांचा एकत्रित फोटोही दाखवला. यावेळी त्यांच्यासोबत फसवणूक झालेले शेतकरीही होते. त्यामध्ये काही महिला शेतकऱ्यांनी मीडियासमोर आपबीती सांगितली. याबाबत कृषीमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेही तक्रार करणार असल्याचे दमानिया म्हणाल्या.
पुढे त्या म्हणाल्या की, जगमित्र शुगर नावाची कंपनी आहे त्याच कंपनीत राजेंद्र घनवट संचालक आहेत. या कंपनीत वाल्मिक कराडही होता. पोपटलाल घनवटही या कंपनीत आधी संचालक होते. माझ्याकडे ११ शेतकऱ्यांचे तपशील आहेत, त्या सगळ्यांना छळलं आहे. एका शेतकऱ्याची २० कोटींची जमीन होती त्याचा व्यवहार ८ लाखांत केला. एकाची एक कोटीची जमीन होती त्याला ४ लाख रुपये दिले. जे जे त्यांच्या विरोधात लढले त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले आणि त्यांचा छळ केला", असा आरोपही दमानिया यांनी केला.
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणात लक्ष घालावे. पुणे आणि खेड येथील शेतकऱ्यांच्या जमिनी काही शासकीय प्रकल्प आणि इंडस्ट्रीजसाठी काढून घेतलेल्या आहेत. धनंजय मुंडे, राजश्री मुंडे, राजेंद्र घनवट, आणि वाल्मिक कराड हे एकाच कंपनीमध्ये डायरेक्टर आहेत. अशा प्रकारच्या दोन कंपनी आहेत, असे दमानिया यांनी सांगितले.



## सतीश भोसले उर्फ खोक्या प्रकरणातून मला व्हिलन ठरवून माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता : आमदार सुरेश धस यांचा गंभीर आरोप

**आष्टी (प्रतिनिधी)**

सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या प्रकरणातून माझी राजकीय कारकीर्द धोक्यात आणून प्रसंगी हरणाच्या शिकारी बाबत विपरीस्थ वक्तव्य करून विष्णूई समाजाच्या समोर मला विलन ठरवून माझ्या कोणाचा कट रचण्यात आला होता असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे

आष्टी येथे पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते बीड जिल्ह्यातील काही बिनकामी जनमानसातून बाद झालेले पुढारी एकत्रित येऊन माझ्या बदनामीसाठी प्रयत्न करत होते त्यातच सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या कारवाईमुळे चर्चा सुरू झाली आणि माझ्या बदनामीचा आणि त्यातून माझ्या हत्येचा कट सचण्यात आला कारण काळवीट आणि हरियाण हे वैष्णवी समाजाचे दैवत समजले जाते या हरणाच्या शिकारी बाबत सतीश भोसले यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे त्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना काही महाभागांनी सतीश भोसले हा आदिवासी समाजातील असून हरिणाची शिकार करून सुरेश धस यांना पुरवतो, असे बिष्णोई समाजाला सांगण्यात आले होते त्यातून बिश्नोई समाजा समोर मला विलन ठरवण्याचा प्रयत्न झाला आणि त्यातून माझा खून करण्यासाठी या समाजातील काही व्यक्तींना राजस्थानवरून विमानाने मुंबईत आणण्यात आले होते. मला मारण्यासाठीच मुंबईत आणले असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. आष्टी येथील औव्दैतचंद्र निवासस्थानी मंगळवार (दि.१)रोजी सायंकाळी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आ.धस बोलत होते.यावेळी ते पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण उचलून धरले होते.या संपूर्ण प्रकरणात राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. यामुळेच मंत्री धनंजय मुंडे यांना देखील राजीनामा द्यावा लागला आहे.या सर्व घटनांदरम्यान सतीश भोसले उर्फ खोक्या भोसले या सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांवर देखील अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत.सतीश भोसलेला अटक देखील करण्यात आली.सतीश भोसले हा हरिणाची शिकार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या माध्यमातून आपल्याला जिवे मारण्याचा कट रचण्यात आला होता, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या माध्यमातून सुरेश धस हे हरणांचे मांस खात असल्याचे पसरवण्यात आले.बिष्णोई समाजाला सुरेश धस यांना हरणाचे मास कसे पुरवले जात होते, हे पटवून सांगण्यात येत होते असे देखील सुरेश धस यांनी म्हटले आहे ते पुढे म्हणाले, इतक्या खालच्या दर्जाचे राजकारण बीडमध्ये जे सुरू आहे ते योग्य नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि तृप्ती देसाई यांना इथल्या खाचा-खोचा माहिती नाहीत. त्या काही पण बोलतात.खोक्याच्या प्रकरणात हे अडचणीत..अरे कशाचे अडचणीत? माझा काय संबंध त्याच्याशी? तो त्याचा शिक्षा भोगत आहे.त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही परळीचा राजकारणात बाद ठरलेले बिनकामी पुढारी आष्टी मतदार संघात बोलवून त्यांच्या तोंडून माझी बदनामी करण्याचे षडयंत्र देखील रचण्यात आले होते.

# परळीचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांना राज्यस्तरीय लोकाशा भुषण पुरस्कार जाहिर

## पालकमंत्री अजितदादा पवार, मंत्री पंकजाताई मुंडेंच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्काराचे होणार वितरण



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

औद्योगिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल परळीचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांना लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय लोकाशा भुषण पुरस्कार जाहिर झाला. आयोजक विजयराज बंब यांनी या पुरस्काराची नुकतीच घोषणा केली आहे. त्याबद्दल ॲल्युमिनियम मॅन भरत गिते त्यांचे सर्व स्तरातून मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून स्वागत व अभिनंदन होत आहे.

पुरस्काराकरीता निवड झाल्याचे पुरस्कार निवड समितीने त्यांना एका पत्राद्वारे कळविले आहे. सविस्तर वृत्त असे की, परळीचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांना औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. यापूर्वी ही त्यांनी केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील कार्यामुळे याआधी बऱ्याच राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत झालेले आहेत. ॲल्युमिनियम मॅन भरत गीते हे भारताला ॲल्युमिनियम उद्योगाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांची दूरदृष्टी निव्वळ व्यवसायापलीकडेही जाते. विकास, शिक्षण आणि देशाच्या विकासाप्रति त्यांची सखोल बांधिलकी आहे. त्यांनी भारतीय उत्पादन क्षेत्रात जागतिक पातळीवरील सर्वोत्तम पद्धतींचा समावेश केलेला असून, मेक इन इंडियामध्येही योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली तौरल इंडिया हे ॲल्युमिनियम कास्टिंग सोल्युशन्स मध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर गेले आहे. शाश्वतता, स्वदेशी उत्पादन

### 2 एप्रिल रोजी पुरस्काराचे बीड येथे वितरण ; मित्र परिवाराकडून ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांचे अभिनंदन

आणि तांत्रिक प्रगती यांवर विशेष भर दिला जातो. बोर्ड ऑफ गव्हर्नन्सवरील नेमणूकः सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे सदस्य म्हणून महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय राज्यपालांकडुन नेमणूक. सीओईपी अल्युम्नी असोसिएशनमध्ये दोन वेळा निवडून आले. 2018 मध्ये दि प्राईड ऑफ महाराष्ट्र या सन्मानाने भरत यांचा एस एम ई चेम्बर ऑफ इंडियाद्वारे गौरव करण्यात आला. हा सन्मान ग्लोबल रिसर्च अलायन्सचे प्रेसिडेंट व कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च (सीएसआयआर) चे माजी डायरेक्टर जनरल डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तौरलच्या महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एक म्हणजे सारथ इन्फंट्री कॉम्बॅट व्हेईकल (BMP-II) मधले त्याचे योगदान. ९०% वाहन स्वदेशी असूनही, एका महत्वाच्या इंजिन ब्लॉक घटकाची सिलेंडर ब्लॉक क्रैंककेस (CBCC) आयात रशियामधून केली जात होती. तौरल इंडियाने CBCCला देशांतर्गत विकसित करून हा ट्रेंड यशस्वीरित्या थांबवला, ज्यामुळे ३४ वर्षांचे आयात चक्र मोडले आणि वार्षिक १०.५ कोटी रुपयांची बचत झाली. २०२२ मध्ये ५व्या वार्षिक SIDM सत्रात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी कंपनीला 'स्पेशल जूरी अवॉर्ड - इम्पोर्ट सब्स्टिट्यूशन' देऊन यासाठी मान्यता देखील दिली. या क्षेत्रात आधीच एक ठसा उमटवल्यानंतर, तौरल इंडिया आता नौदल क्षेत्रात तटरक्षक दलाच्या जहाजांसाठी ट्रान्समिशन गिअरबॉक्सेस आणि वॉटरजेट प्रोपल्शन सिस्टम वितरीत करून सागरी संरक्षण पायाभूत सुविधा मजबूत करण्यात एक अधिक मोठी भूमिका पार पाडत आहे. हवाई दलासाठी तौरल इंडियाने हेलिकॉप्टर आणि विमानांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या इंजिन कास्टिंगवर लक्ष केंद्रित केले आहे, जेणे करून ते सशस्त्र दलांच्या तिन्ही शाखांना पाठिंबा देण्याची आपली वचनबद्धता अधिकाधिक बळकट करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत बजेटपूर्व कॉन्फरन्सकरीत 30 उद्योजकांच्या निवडक पॅनलमध्ये समाविष्ट होण्यासाठी भरत गिते हे उपस्थित होते. उत्पादन व औद्योगिक क्षेत्रांमधील त्यांचे योगदान लक्षात घेऊन हे आमंत्रण देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेत अहिल्यानगर जिल्ह्यात सुपा औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक आणि १,२०० रोजगार निर्मिती यासाठी महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, राज्यातील औद्योगिक विकासाला नवी चालना मिळेल.आणि राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीला गती मिळणार आहे. या गुंतवणुकीत अल्युमिनियम मॅन भरत गिते यांनी मोलाचे योगदान दिले. औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षीचा राज्यस्तरीय लोकाशा भुषण पुरस्कार जाहिर करण्यात आला.

लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.31 मार्च ते 2 एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दोन एप्रिलला दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. याच सोहळ्यात राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या कार्यक्रमाला राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार व सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती राहणार आहे. सदरील पुरस्काराचे विशेष समारंभात वितरण करण्यात येणार आहे. प्रत्येकी एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी परळीचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन भरत गिते म्हणाले की, मिळालेला पुरस्कार माझी सामाजीक जबाबदारी व काम करण्याची नैतिक जबाबदारी वाढवीत आहे तसेच ते माझा उत्साह वाढवीत मला सकारात्मक ऊर्जा देत माझी प्रेरणा वाढवीत असल्याचे मत त्यांनी.

आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल परळीचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांचे शैक्षणीक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार व नातेवाईकांकडून स्वागत व अभिनंदन होत आहे.

# प्रशासनातील दीपस्तंभ : सनदी अधिकारी श्री तुकाराम मुंढे

**मा.श्री तुकाराम मुंढेसाहेबांचा हे जेव्हा आयएएस झाले त्या वर्षी म्हणजे पंधरा वर्षांपूर्वी सत्कार केला होता. आणि आज त्यांचे कार्य पाहून आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो. मिशन आयएएसचे उद्घाटन सध्याचे मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव मा.श्री विकास खारगेसाहेब यांनी 12 मे 2000 ला केले. तेव्हापासून तर 25 वर्षापर्यंत आम्ही दरवर्षी आयएएस झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करीत आहोत. साधारणपणे आतापर्यंत 373 आयएएस आयपीएस आयएएस सनदी व राजपत्रित अधिकारी आमच्या या उपक्रमात सहभागी झाले आहेत. श्री तुकाराम मुंढेसाहेब जेव्हा आयएएस झाले .तेव्हा मी सत्कारासाठी यांना फोन लावला .साहेब तेव्हा खूपच व्यस्त होते .पण ते तळमळीने म्हणाले काठोळेसर आज शब्द देत नाही .पण येण्याचा पूर्ण प्रयत्न करेन आणि एक दिवस मा. श्री तुकाराम मुंढे साहेबांचा फोन आला म्हणाले. मी तुमच्या अमरावतीच्या कार्यक्रमाला येतो .**

कार्यक्रमाच्या दिवशी श्री तुकाराम मुंढे साहेब औरंगाबादवरून बसने आले . मी त्यांना माझी स्कूटर घेऊन त्यांना घ्यायला गेलो. माझ्या स्कूटरवर बसून आम्ही घरी आलो . श्री तुकाराम मुंढे येणार हे बऱ्याच लोकांना त्यांच्या मित्रमंडळींना माहीत होतं .अमरावतीचे त्यांचे मित्र श्री संदीप राठोड श्रीमती कुसुम राठोड सध्या चर्चेत असलेले नागपूरचे आयपीएस अधिकारी व सध्या उत्तराखंडमध्ये आयजी पोलीस महासंचालक असलेले श्री निलेश भरणेसाहेब ही सगळी मंडळी माझ्या घरी आली. सत्कारासाठी पुणे येथून श्री श्याम देशपांडे आयपीएस हर्षद वेंगुरलेकर आयआरएस आणि इतर मंडळी माझ्याकडे पोहोचली. तेव्हा साधन सामग्री फार नव्हती. माझ्याकडे कार पण नव्हती. सर्व व्यवहार मी आणि माझे कार्यकर्ते टू व्हीलर वर करीत होतो. श्री निलेश भरणे साहेब आयपीएस यांनी नागपूर वरून येताना मारुती व्हॅन आणल्यामुळे ती आमच्या पाहुण्यांच्या उपयोगी पडली .

सत्काराचा हा कार्यक्रम अमरावतीच्या मोर्शी रोडवरील महाराष्ट्रातील सर्व सभागृहात भव्य असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनामध्ये झाला . श्री तुकाराम मुंढे साहेबांचे भाषण सर्वांना मनापासून आवडले .सर्व सत्कारमूर्ती श्री निलेश भरणे श्री श्याम देशपांडे श्री हर्षद वेंगुरलेकर यांची देखील भाषणे झाली. स्पर्धा



परीक्षेचा तो सुरुवातीचा काळ होता .व्यापक प्रमाणात जनजागृती झाली नव्हती. मिशन आय ए एस ने तो भार उचलला होता. माननीय श्री तुकाराम मुंढे साहेबांचे भाषण ऐकण्यासाठी सभागृह भरले होते. या सभागृहामध्ये कुमारी पल्लवी चिंचेकडे नावाची सातवा वर्ग शिकणारी गरीब घरची विद्यार्थिनी होती. या भाषणामुळे तिला प्रेरणा मिळाली. दुसऱ्या दिवशी ती माझ्याकडे आली. या भाषणापासून प्रेरणा घेऊन तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला आणि आता ती केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा उत्तीर्ण होऊन सनदी अधिकारी म्हणून दिल्लीला रुजू झालेली आहे. इतके मुंढे साहेबांचे भाषण प्रभावी झाले .या भाषणातून पल्लवी चिंचखेडे नावाची मुलगी सनदी अधिकारी घडली हे सर्वात महत्त्वाचे आहे.

साहेब सोलापूरला जिल्हाधिकारी असताना त्यांनी पंढरपूरच्या वारी दरम्यान घेतलेला निर्णय आजही सर्वांच्या स्मरणात आहे. पंढरपूरच्या वारीला लाखो लोक भारताच्या कानाकोपऱ्यातून येतात. मुंढे साहेब जिल्हाधिकारी येण्याअगोदर पंढरपूरचे मंदिर अकरा वाजता बंद होत होते. तसेच मा .मुख्यमंत्र्यांच्या व विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षाच्या पूजेला खूपच वेळ लागायचा. अकरा वाजता मंदिर बंद झाले म्हणजे जे लोक दर्शनासाठी लाईनमध्ये उभे आहेत त्यांना पण दर्शन घेणे शक्य व्हायचे नाही. त्यांना परत दुसऱ्या दिवशी लाईनमध्ये उभे राहावे लागत होते. इतक्या लांब प्रवास करून आलेल्या भाविकांना लाईनमध्ये उभे राहूनही मंदिर अकरा वाजता बंद झाल्यामुळे दर्शन व्हायचे नाही .साहेबांच्या ते लक्षात आले आणि त्यांनी लगेच सर्व पुजाऱ्यांची सभा घेतली.

मा.मुख्यमंत्र्यांची पूजा तसेच विश्वस्तांच्या अध्यक्षांची पूजा लवकर व्हावी यासाठी त्यांनी सतत पुजाऱ्यांची प्रॅक्टिस घेतली. त्यामुळे पूजेचा कालावधी एक तासाने कमी झाला. तसेच अकरा वाजता मंदिर बंद होण्याच्या वेळेस रांगेमध्ये जेवढे लोक अकरा वाजता उभे आहेत तेवढ्यांचे दर्शन झाल्याशिवाय मंदिर बंद होणार नाही हा नवा पायंडा त्यांनी पाडला. त्यामुळे पंढरपूरच्या मंदिरामध्ये लाखो भाविकांची सोय झाली. सुरुवातीला पंढरपूरच्या मंदिराच्या विश्वस्थानी त्यांनी विरोध केला. पण सोलापूरचे जिल्हाधिकारी असलेले श्री तुकाराम मुंढेसाहेब आपल्या निर्णयावर ठाम राहिले. शेवटी विश्वस्त नमले आणि मुंढेसाहेबांना त्यांनी होकार दिला.

आम्हाला आज अभिमान वाटतो की महाराष्ट्रात श्री तुकाराम मुंढेसाहेब जे काम करीत आहेत ते निश्चितच गौरवास्पद आहेत . त्यांच्या कार्याचा अभिमान आहे आणि या कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याचा आम्ही पंधरा वर्षापुर्वी मिशन आय ए एस तर्फे सत्कार केला याचा आम्हाला अभिमान आहे . सातत्याने चांगले काम करणाऱ्या व सर्व सामान्य साठी भारतीय संविधानाचा वापर करून नवा पांडा पाडणाऱ्या आणि सनदी अधिकाऱ्यांमध्ये तसेच जनसामान्यांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या श्री तुकाराम मुंढे साहेब यांना शुभेच्छा देतो .

**- प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे .**
**संचालक :मिशन आय ए एस**

संपादकीय

## उत्सुकतेने सगळेच झोपल

सांप्रतकाळात अभिजात वगैरे दर्जाचा दुरभिमान पोसणाऱ्या मराठी 'साहित्याची भूमी' कोणत्या स्थितीत, याचे उत्तर तीन पिढ्यांच्या वाचन- संसारातल्या किंवा वाचन-काडीमोडानंतरच्या व्यवहारांवरून शोधावे लागेल. १९८१ ते ९६ पर्यंत वाचनकक्षेच्या साधारण वयात आलेली 'मिलेनियल' पिढी, १९९७ ते २०१२ पर्यंत जन्मलेली 'जेन झी' पिढी आणि २०१० ते २०२४ या काळात भूतळावर कोसळलेली 'अल्फा' पिढी. त्या आधीच्या 'जेन एक्स' अथवा साठोत्तरीत बंडखोरीचे झेंडे फडकावणारी 'बूमर्स' या पिढीतील तथाकथित मुरब्बी उरलेत फक्त पुरस्कार घेऊन क्षीण नाचण्यासाठी आणि क्षणसाजऱ्या कौतुकासाठी. तर याआधीच्या दोन पिढ्यांना व्यवधाने नव्हती; त्याच्या शतपटींत नंतर वाढली. पुढल्या पिढ्यांना उपग्रह वाहिन्या आल्यानंतरच्या द्रुतगतीने धावणाऱ्या क्रांत्यांमध्ये जगाशी अद्यायावत राहत संगणकाच्या सतत विकसित होत राहणाऱ्या आवृत्त्यांशी एकरूप होताना, माहितीच्या स्फोटांमध्ये मेंदूत आधी असलेल्या तपशिलांना राखत बुद्धीशकले होण्यापासून स्वतःला सावरताना आणि समाजमाध्यमांची व्यसननशा अंगभर भिनूनदेखील सुखात जगताना किती तारेवरची कसरत करावी लागली याची जाणीवदेखील 'जेन एक्स' किंवा 'बूमर्स'ना असू शकत नाही. तर या अजस्त्रा पसाऱ्यात त्यांच्याकडून ग्रंथोत्तेजनाची अपेक्षा करणे किती अवघड गोष्ट, हेदेखील उमजू शकत नाही. या पिढ्या ई-मेल्स, इन्स्टापोस्ट, व्हॉट्सॲप पिंग्ज आणि या विद्यापीठात फॉरवर्डींनी पसरविलेले उपयोजित प्रबंध डोळे दुखेस्तोवर वाचतात. रील्स-व्हिडीओ न्याहाळत त्यांचे तासचे तास निष्प्रभ होतात. 'ट्रेण्ड'च्या नावाखाली महापुरुषाची जयंती आपापल्या वाहनाला झेंडा लावून साजरी करण्यात त्यांना धन्यता वाटते. शुक्रवारी थिएटरमध्ये रक्त खवळून काढणारा वगैरे सिनेमा पाहून झाल्यावर 'छावा' कादंबरीच्या तीन-चारशे प्रती त्यांच्याकडून खरेदी केल्या जाऊ शकतात. 'साहित्याच्या भूमी'तल्या नापिकीचीच ही वेळ कधीपासून आली?

साहित्याच्या सकस भूमीचा ऱ्हास होण्याचा प्रकार 'मिलेनियल' पिढी रांगण्यास आरंभ करीत होती तेव्हापासूनच सुरू झाला, असे म्हणावे लागेल. श्री.पु. भागवतांनी ऑगस्ट १९८२ मध्ये 'सत्यकथा' मासिकाच्या शेवटच्या अंकात दिलेल्या निवेदनात म्हटले की 'आज घटकेला सत्यकथेच्या दरमहा १,८७५ प्रती काढण्यात येतात. त्यांपैकी १,२६८ वर्गणीदार, ३४५-५० विक्रेत्यांकडे किरकोळ खपणाऱ्या व २२० भेटीदाखल जाणाऱ्या असतात. दिवाळी अंकांची संख्या ४,२५० असते. या सर्व प्रतींचा एकूण मुद्रणखर्च, संपादकीय व व्यवस्थापकीय सहकाऱ्यांचे पगार, कार्यालयीन इतर खर्च, लेखक-कलावंतांचे मानधन, टपालहशील व तत्सम खर्च मिळून वर्षाला एकूण खर्च प्रत्यक्षाप्रत्यक्ष ९९,४७५ रुपये इतका होतो. वर्गणी, किरकोळ विक्री व जाहिराती मिळून एकूण उत्पन्न ५३,८५० रुपये इतका होतो. या वर्षी सत्यकथेचा निव्वळ तोटा ४५ हजार ६२५ इतका आहे. याचा अर्थ असा की, सत्यकथेचा प्रत्येक महिन्याचा अंक सुमारे पावणेचार हजार रुपये नुकसान सोसून काढला जातो'! हे मासिक मराठी भाषेच्या समृद्धीसाठी, लोकांत साहित्याभिरुचीची जडण-घडण व्हावी यासाठी तोटा सोसून कित्येक दशके निघत होते. या परमोच्च स्थानी मानल्या जाणाऱ्या मासिकाची ही दु:स्थिती, तर पुढल्या क्रांत्यांत ढेपाळत गेलेल्या मासिक-साप्ताहिकांची काय परिस्थिती असणार? आज भाषेला अभिजात दर्जा आहे; पण अस्तित्वासाठी झगडणाऱ्या पण हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या मासिकांना तगण्याइतपत 'प्राणवायू' लाभेल काय, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण अभिजात दर्जा मिळविणाऱ्या मल्याळममध्ये वर्गणीदारांनी जपलेली २३ च्या वर बालमासिके आहेत. तिसाहून अधिक साहित्यिक नियतकालिके आहेत. तमीळमध्ये दीड डझन साहित्यिक नियतकालिके, तर डझनभर बालमासिके आहेत. तेलुगूमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. या भाषांची मुद्रित साहित्य वाचनाची भूक अधिक त्यांच्याच चित्रपटगोष्टी सध्या संपूर्ण भारतात तिकीटबारीवर गल्लाभरू ठरत आहेत, हादेखील योगायोग म्हणावा काय? या पार्श्वभूमीवर आपण कुठे आहोत, याची सांख्यिक गरिबी खिन्न करणारी नाही काय? आदल्या पिढ्यांना- 'जेन एक्स' किंवा 'बूमर्स'ना- आपले बुद्धिचातुर्य अथवा ज्ञानपारंगतता चमकवण्यासाठी नियतकालिकांचाच आधार होता. नव्वदीनंतर अनेक आकर्षण केंद्रांनी हे पारंपरिक सहजमार्ग जेव्हा बंद होण्यास सुरुवात झाली, तेव्हा मराठीत वाचक नावाचा नवा वर्ग घडण्याचे इतर मार्गही आपसूक खुंटत होते. नव्वदीच्या आरंभी मध्यमवर्गातील 'मिलेनियल' मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाऊ लागली. दोन हजारानंतर निमशहरी भागातील निम्नमध्यमवर्गातील पालकांनीही खिशाला भार सोसून इंग्रजी शाळांचा आग्रह आपल्या मुलांसाठी धरला. ती आज घराघरांतील कर्ती-धर्ती झालेली 'मिलेनियल' आणि 'जेन एक्स' मराठी भाषेपासून, साहित्यापासून दूर गेली यात नवल नाही. नवल हे आहे या काळात नाइलाज म्हणून मराठीतून शिक्षण घेणाऱ्या तुरळक तरीही संभाव्य वाचक घडू शकणाऱ्या वर्गापुढे तरी काय आणि किती चांगल्या दर्जाचे साहित्यिक वातावरण तयार केले गेले? नव्या लिहिणाऱ्यांचे आणि समकालातील प्रश्नांशी भिडणाऱ्यांचे किती साहित्य पुढे केले गेले?



**मुंबई वृत्तसंस्था**

ठाणे कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ ठाणे जिल्हा कार्यकारणी तर्फे दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी मराठी भाषा हा विषय सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अनिवार्य करण्यासाठी दि. १३ सप्टेंबर, २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी यासाठी माननीय जिल्हाधिकारी (ठाणे), उपजिल्हाधिकारी (ठाणे) व आमदार डॉ. बालाजी किणीकर यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या ठाणे जिल्हा प्रतिनिधी प्रा. मंजिरी गजरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा कार्यकारणी तर्फे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष प्रा.अर्जुन उगलमुगले सर (न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कल्याण) उपाध्यक्षा प्रा. मनीषा राजपूत (स. प्र. ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे ) सहसचिव प्रा. हरेश्वर भोये (स. प्र. ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे ) महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. ज्योती लिपारे तसेच स. प्र. ज्ञानसाधना कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषय शिक्षक प्रा. डॉ. वंदना शिंदे, प्रा. कांतीलाल चव्हाण व प्रा. ऋतुजा फाटक इत्यादी शिक्षक उपस्थित होते.

# सेवाव्रती सुभाष नाणेकर...

*सर्वेषां शार्ती भवतु*
*सर्वेषां पूर्ण भवतु*
*सर्वेषां मंगलम् भवतु*
*लोकाःसमस्ताः*
*सुखिनो भवतु !*

शांती मंत्रातील हा उत्तर भाग सहसा म्हंटला जात नाही. पण सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात आपल्या तीस/पस्तीस मिनिटाच्या परिपाठाच्या समारोपात शांती मंत्रातील हा भागही नाणेकर सर अगदी भावूकतेने व श्रृध्देने म्हणायचे आणि त्यांच्या मागे कोरस मध्ये मुला मुलींचा तसाच सश्रृध्द आवाज यायचा.

सर्वांच्या म्हणजे तमाम मुलां मुलींच्या पुर्णत्वा साठी,त्यांच्या मांगल्या साठी व त्यांच्या सुखी भविष्यासाठी हा परिपाठ रोज व्हायचा. आणि शाळेच्या दैनंदिन कामकाजाला एका अनामिक श्रध्देने,धीर गांभियनि सुरूवात होत असे. विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेमध्ये निश्चित वाढ होत असे.शिकणं सहज होण्यासाठी ,फलदायी होण्यासाठी गुरूजींचे शिकवणे,त्यांचे सहज ,सोपे ,प्रवाही बोलणे ,विषय सोपा करून सांगण्याची गुरूजींची हातोटी व त्यांचे विषय ज्ञान ह्या गोष्टी जेव्हढ्या अवश्यक तेव्हढंच सभोवतालचे वातावरण,शिकणाऱ्या चे शांत मन या गोष्टी अधिक महत्वाच्या असतात.नाणेकरांच्या परिपाठाने हे नक्की साध्य होत असे.

सर्वांग सुंदर व्यायामाचे सर्व प्रकार ते आलटून पालटून करून घ्यायचे.सुर्य नमस्कार, सुर्याची बारा नावं,गायत्री मंत्र,एखादं छानसं ,सुंदर समुहगीत,राष्ट्रभक्तीपर गीत,शौर्य गीत या सर्व प्रकारात अनेक मुला मुलींना सामावून घेऊन ,बदलून बदलून मुला मुलींना व्यासपीठावर बोलावून ते परिपाठाची रंगत उत्तरोत्तर वाढवायचे.क्वचित पहिल्या तासिकेचे पाच दहा मिनिटं जायची तरीही कुणाची कधी तक्रार नसायची.

एक परिपूर्ण क्रिडा शिक्षक कसा असावा तर सुभाष



**लेखक**
**पद्माकर देशपांडे - पी. एन.**

नाणेकरां सारखा! हे विधान कुठलाही व्यक्तीगत स्वार्थ वा आंधळी दोस्ती यातून मी करत नाही . मैदानावरील कामे तर ते करायचेच पण दिन समारंभ,दे शभक्तांच्या जयंत्या ,क्रांती कारकांना अभिवादन हे त्यांच्या अंगवळणी पडलेले. कधी त्यांचं बोलणं सुसंगत ,आशयघन नसायचे पण त्यांचा श्रृध्दाभाव,त्यामागची विशुध्द भावना सहज दिसून यायची. शाळेचा क्रिडा विभाग त्यांनी संपन्न करून ठेवला.

मल्लखांब, दोरी मल्लखांब, योगासन प्रकारात त्यांचे मार्गदर्शन अप्रतिम होते व आजही आहे.मुला मुलींना खेळात पारंगत करणे ,त्यांना संस्कार संपन्न करून एक उमदं व्यक्तिमत्व त्यातुन घडत असे.

गुरूदेव रविंद्रनाथ टागोर म्हणत असत, " पृथ्वीतलावर जन्माला येणारे मुल सोबत ईश्वराचा अंश घेऊन येते,त्याच्यातील देवत्व टिकवण्याचे वाढविण्याचे काम सर्वात आधी जन्मदाते करतात,नंतर शाळा व तिथले शिक्षक करतात आणि शेवटी समाज करतो.नाणेकर हे काम, मुलातील देवत्व टिकवण्याचेच काम करतात.

"इतनी शक्ती हमे दे ना दाता,की मन का विश्वास कमजोर हो ना " अशी प्रार्थना असो की " सर्वेश्वरा,शिव सुंदरा स्विकार या अभिवादना. तिमिरातूनी तेजाकडे प्रभू ने आमुच्या जितना " ही प्रार्थना नानेकरांच्या मागे सगळी मुलंमुली डोळे मिटून भावूकतेने म्हणायची हे दृश्य सर्वांनाच स्पर्शून जात असे.

एकदा अशीच एक नवी प्रार्थना मी त्यांना दिली व तिचे वाचन एका दहावीच्या मुलीला करण्यास सांगितले ,तीने ते अतिशय सुंदर, भावूक आवाजात केले.नंतर वर्ग सुरू झाला व त्या मुलीने विचारले ," सर खरेच परमेश्वर अशी शक्ती आपणास देतो का?

मी म्हणालो होतो," नानेकर करतात तसं कर,

" देवाला मागणं घालणं आणि देवाला प्रार्थना करणं या दोन भिन्न बाबी आहेत. सर्व कांही परमेश्वराच्या स्वाधीन आहे असं समजून प्रार्थना करायची व सर्व कांही आपल्यावरच अवलंबून आहे असं समजून प्रामाणिक पणे आपलं काम केलं की फळ मिळतंच. सुभाष नाणेकरांचे आजही तसेच आहे.सेवानिवृत्त झाल्यानंतर जवळपास दहा वर्ष लिटल फ्लावर स्कूल मध्ये काम केलं, कोणताही सार्वजनिक उपक्रमात नाणेकर नाहीत असं होत नाही.

उन्हाळी व्यायाम व संस्कार वर्ग नियमित चालवण्यात,व त्याचा शिबिरार्थी मुला मुलींना करून देण्यात नाणेकर कधी कमी पडले असं झालं नाही.

...नाणेकरांना मैदानावर नाणेकरांना पाहिलं की मुलांचा स्वतःवरचा विश्वास वाढतो व मुलं मुली जोराने काम करू लागतात. नाणेकरांच्या परिपाठ व एकूणच साधनेतून हे दिसून येते. नानेकरांना शहरातील विविध संघटनांचे ,अनेकांनी आयोजिक केलेल्या परळी फेस्टिव्हल चे पुरस्कार मिळाले ,मान सन्मान मिळाला.अर्थात नानेकर सरांनी ही तेवढे योगदान दिलेले आहेच.

अनेक कुस्ती स्पर्धेत त्यांना आजही आयोजन समिती सदस्य वा पंच म्हणून बोलावलं जातं. अश्विनी कुमार भोईर कब्बडी स्पर्धा शहरात झाल्या तेंव्हा नाणेकरांनी खूप कष्ट उपसले होते. बीड जिल्हा क्रिडा शिक्षक संघटनेचा मानाचा पुरस्कार त्यांना मिळाला होता. आमच्या सरस्वती विद्यालयाचे प्रजासत्ताक दिनी मोंढा मैदानावर परळीकरासाठी मोठा कार्यक्रम असायचा त्यात मल्लखांब, दोरी मल्लखांब (मुलं मुली) व सर्व क्रिडाप्रकार ,सामुहिक कवायती होत असत यात मेजर योगदान नानेकरांचे असायचे. घरच्या कांही विशिष्ट जबाबदारी मुळे त्यांचा दिवस पहाटे चार पासून सुरू होतो आजही.

कधी सभा,बैठकात त्यांना ऐकता ऐकताच डुलकी लागायची पण आपली व्यथा चे निमित्त करून त्यांनी कधीही काम टाळले नाही,वा कधी सूट मागितली नाही. त्यांचे आज अमृतमहोत्सवी वर्षात म्हणजे वयाच्या पंच्याहत्तर व्या वर्षी ही दैनंदिनी चालू आहे। ...

नर्मदा परिक्रमेत शालीवाहन आश्रमाच्या भिंतीवर मी एक सुंदर विचार लिहलेला पाहिला होता.मी माझ्या डायरी मध्ये लिहून ठेवला आहे.तो असा,

**" तीन बजे जागे सुयोगी**
**चार बजे जागे सुसंत**
**पांच बजे जागे सो महात्मा**
**छह बजे जागे सो भगत.**
**...बाकी सब ठगत ठगत...**
**या सुविचारा नुसार नाणेकर सुसंत आहेत..**
**त्यांचे स्वास्थ्य, त्यांचे यानंतरचे सहस्त्र चंद्र व नंतरचे शतकी आयुष्य सुखी व निर्मळ व निरामय ठेवण्यास ते सक्षम आहेत..तरीही**
**ते तसे सक्षम, सुदृढ राहोत प्रभू वैजनाथाकडे प्रार्थना करून मी आपली रजा घेतो.**

## लोकमानस



मुलखावेगळी माणसं

### किशोरवयीन गणितज्ञ आर्यन

मानवाने आपल्या तल्लख बुद्धिमतेच्या जोरावर बुद्धिमत्तेचा अद्ययावत नमुना मानल्या गेलेल्या संगणकासारख्या कृत्रिम यंत्राची निर्मिती केलेली असली तरी आपल्या सभोवताली अशी काही बुद्धिमान माणसं आपल्याला आढळतात कि त्यांची तल्लख बुद्धिमत्ता हि संगणकाशी बरोबरी करू शकेल इतकी सुपरफास्ट असते. महाराष्ट्रातील १४ वर्षांच्या एका गणितज्ञ मुलाने आर्यन शुक्लाने अलीकडेच दुबई येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत मानसिक गणनेत सहा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करून स्वतःला बुद्धिमान वेगवान गणितज्ञ म्हून सिद्ध केले आहे. मानवी कॅल्क्युलेटर अशीच ओळख बनलेल्या आर्यन ने बेरीज,गुणाकार आणि भागाकारात विजेत्या वेगाने गती मिळवली. आर्यन त्याच्या या यशाचे संपूर्ण श्रेय कठोर दैनंदिन सराव,आणि सहज योग् ध्यानाला देतो. ज्यामुळे त्याला लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली. मानसिक गणितातील आर्यांन चा प्रवास हा वयाच्या १२ व्या वर्षी सुरु झाला आणि जर्मनीमध्ये मानसिक गणनेचा विश्वचषक त्याने जिंकला आहे.

आर्यन शुक्लाने मानसिक गणितामध्ये जो गतिमानतेचा विक्रम प्रस्थापित केला त्यामध्ये,मानसिकदृष्ट्या १०० चार अंकी संख्या जोडणे[३०. ९ सेकंड],मानसिक दृष्ट्या २०० चार अंकी संख्या जोडणे [१ मिनिट ९ . ६८ सेकंड ],मानसिक दृष्ट्या ५० पाच अंकी संख्या जोडने[ १८ . ७१ सेकंड ] ,२० अंकी संख्येला दहा अंकी संख्येने मानसिकरीत्या विभाजित करणे [५ मिनिट ४२ सेकंड ] अशा विविध विक्रमांचा समावेश आहे. आर्यन या स्पर्धेत उतरला तेंव्हा दरररोज सुमारे पाच ते सहा तास सराव करत असे. उच्चक्षमतेच्या गणितासाठी मानसिक शांती आणि एकाग्रता तसेच सहज ध्यान धारणा त्याला उपयोगी आली. आर्यांचा मानसिक गणितातील हा प्रवास त्याच्या लहानपणापासूनच सुरु झाला. वयाच्या सहाव्या वर्षांपासून तो त्याच्या कौशल्यानं बळकटी देत होता. २०२२ मध्ये त्याने अवघ्या १२ व्या वर्षी जर्मनीमध्ये प्रतिष्ठित मानसिक गणना विश्वचषक जिंकला,तो जागतिक मानसिक गणनाला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित असलेल्या ग्लोबल मेंटल कॅल्क्युलेटर असोशिएशन च्या संस्थापक सदस्यांपैकी एक आहे. आर्यन च्या या असामान्य गणितीय क्षमतेव्यतिरिक्त आर्यनाला साहसी आणि रहस्यमय पुस्तके वाचणे,व्हिडीओ गेम खेळणे,आणि क्रिकेट खेळणे आवडते. टायच्या पालकांनी त्याची प्रतिभा लहान पनापासूनच ओळखली आणि त्याला स्पर्धात्मक मानसिक गणितासाठी सतत प्रोत्साहित केले त्यामुळेच आर्यन आज हे यश पाहू शकलेला आहे. मानसिक गणितात अनेक अंकांच्या घडामोडी या सेकन्डच्या शंभर अंशापेक्षाही जलद गतीने घडतात आणि तयच तत्पर वेगाने आर्यन या गणिती घडामोडींचा आपल्या अफाट स्मरणशक्तीच्या जोरावर सामना करतो. आर्यन ला टायच्या या कामगिरी बद्दल मानवी कॅल्क्युलेटर ची उपाधी मिळालेली आहे. त्याला भविष्यात गणित विषयातच सखोल अभ्यास करून इलेक्टॉनिक इंजिनिअर व्हायचे आहे. अर्थातच अतिशय अफाट बुद्धिमत्ता असलेला आर्यन त्याचे हे स्वप्न अगदी सहज पूर्ण करेल यात शंका नाही.




चलती का नाम गाडी

### नवीन डिफेंडर ओसीटीए लाँच

डिफेंडरने भारतातील अविश्वसनीय ४x४ डिफेंडर कुटुंबातील सर्वात कठीण, सर्वात सक्षम आणि सर्वात आलिशान एसयूव्ही, न्यू डिफेंडर ओसीटीए लाँच केली. हा उच्च-कार्यक्षमता साहसी आयकॉन अतुलनीय आत्मविश्वास आणि परिष्काराने कोणत्याही भूभागावर विजय मिळविण्यासाठी डिझाइन केलेला आहे.४.४ लिटर ट्विन टर्बो माइल्ड-हायब्रिड व्ही८ इंजिनद्वारे समर्थित, ओसीटीए मॉडेल आतापर्यंतचा सर्वात टोकाचा आणि सर्वात शक्तिशाली डिफेंडर आहे, ज्यामध्ये ४६७ किलोवॅट आणि ७५० एनएम१ पर्यंत टॉर्क आहे जो ४.० सेकंदात ०-१०० किमी/ताशी सक्षम करतो. ६डी डायनॅमिक्स सस्पेंशनसह नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह मोठ्या प्रमाणात सुधारित चेसिस घटक, त्याच्या गतिमान क्षमतांना नवीन उंचीवर नेण्याची खात्री देतात.

बाह्य भाग नेहमीपेक्षा अधिक ठळक आणि कठीण आहे, एक वेगळे वैशिष्ट्य आहे. राइडची उंची उंचावली आहे, त्याची स्थिती रुंद केली आहे आणि अविश्वसनीय उपस्थितीसाठी व्हील आर्च वाढवल्या आहेत. पुन्हा डिझाइन केलेले बंपर सुधारित दृष्टिकोन आणि निर्गमन कोन देतात, तर कठोर अंडरबॉडी संरक्षण ड्रायव्हर्सना खडबडीत भूभागावर अधिक एक्सप्लोर करण्याचा आत्मविश्वास देते. जेएलआर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राजन अंबा म्हणाले: "डिफेंडर हे भारतात आमच्यासाठी एक गेम-चेंजर ठरले आहे, ते केवळ आमचे सर्वाधिक विक्री होणारे मॉडेलच नाही तर त्याच्या श्रेणीतील सर्वाधिक विक्री होणारे मॉडेल देखील बनत आहे, लाँच झाल्यापासून मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. या प्रतिष्ठित वाहनाने बाजारात एक अढळ ब्रँड इक्विटी निर्माण केली आहे, जी त्याच्या अतुलनीय क्षमता, लक्झरी आणि साहसाला महत्त्व देणाऱ्या ग्राहकांमध्ये खोलवर प्रतिध्वनीत आहे"

वाद संवाद

### वीज कंपन्यांची वीजकपात दिलासादायक आहे का? : महेंद्र पोळ शिक्षक

टाटा पॉवर,अडाणी,बेस्ट आणि महावितरण सारख्या वीज कंपन्यांनी ऐन उन्हाळ्यात वीज दर कपात करून सर्वसामान्यांना आणि गोरगरिबांना सुखद असा दिलासा दिलेला आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये विजेच्या दरात अव्वाच्या सव्वा भाववाढ झालेली. अर्थात त्यामुळेच भरमसाठ असे विजेचे बिल भरताना सर्वसामान्यचे कंबरडे मोडण्याची अवस्था होती. अशा परिस्थितीत घरगुती विजेच्या युनिट दरात काही प्रमाणात का होईना झालेली कपात हि स्वागतार्ह आहे. मात्र त्याच वेळी सर्व सामान्य ग्राहक म्हणून याच विजेचा गैरवापर न करता जास्तीत जास्त बचत करणं आणि त्या मध्यमातून एका अर्थाने पैशाची बचत करणं हे आता सर्वांचे कर्तव्य आहे.

सीमा म्हात्रे
गृहिणी

विविध वीज कंपन्यांनी घरगुती वीज दरामध्ये काही प्रमाणात कपात केली हि बाब नक्कीच आनंदाची आहे. मात्र,त्याच वेळी आपल्या सर्वांचा जो अन्नदाता आहे बळीराजा त्याच्या शेताला मोफत वीज पुरविण्याची सरकारची जी योजना आहे,त्याची देखील वीज कंपन्यांच्या माध्यमातून सरकारने परिपूर्तता करायला हवी. आणि घरगुती वीज ग्राहकांना वीज दरात कपात करून जो दिलासा मिळाला आहे त्यामुळे वीज कंपन्यांचे देखील नुकसान व्हायला नको. म्हणूनच ज्या औद्योगिक कंपन्या आहेत त्यांच्या वीज दरात काही अंशी वाढ करून वीज कंपन्यांनी हि तूट भरून काढावी असं वाटत.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# मोत्यांच्या अक्षरांचे केंद्र ठरतेय भवरवाडीची जि.प. प्राथमिक शाळा


## उत्कृष्ट कलाकृती, सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन एक वेगळा ठसा शाळेने उमटविला

## जूनी इमारत झाल्याने विद्यार्थी जिव धोक्यात घालून शिक्षण घेतात

**कडा । सोपान पगारे**

तालुक्यातील जि. प. प्रा.शाळा भवरवाडी या शाळेत पहिली ते चौथी या चार वर्गात ३० विद्यार्थी आहेत. येथे मुख्याध्यापक सुनिल काकडे तर सहशिक्षक म्हणून अनिल बेद्रे आहेत. अनिल बेद्रे हे शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबर सर्व विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर होण्यासाठी विशेष परिश्रम घेतात. शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक् गुणवत्ता चांगली आहे. या शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर आहे.

शाळेतील विद्याथ्यर्थ्यांचे पाठांतर, पाढे पाठांतर, इंग्रजी वाचन चांगले आहे. प्राथमिक शिक्षण दर्जेदार मिळत आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी कलेग्राफी साठी ३०० रु. किंमतीचे पेन सरपंच भरत भवर यांनी दिले आहेत. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण भवर, संतोष भवर यांचेही शाळेसाठी योगदान असते. येथे ५५ ते ६० वर्षापूर्वीची जुनाट अशी दोन खोल्यांची शाळेची इमारत आहे. ही इमारत विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य नाही. येथे इमारत होणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचा दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला जातो. १०० ते १२५ घरे असलेली भवरवाडी




आहे, मात्र जागरुक पालकांमुळे प्राथमिक शाळेत दर्जेदार ज्ञानदानाचे कार्य शिक्षक करत आहेत. ग्रामस्थांचा लोक सहभाग व शाळेला मदत करण्याची भूमीका असल्याने विविध शैक्षणिक उपक्रम, कार्यक्रम राचविले जातात. पालक, ग्रामस्थांच्या सहभागातून शाळेत



नुकतीच शिवजयंती साजरी झाली. यानिमित्ताने तीन तासांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. यावेळी पालक व ग्रामस्थांनी सढळ हाताने विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली. ४० हजार रु. जमले आहेत. सरपंच ज्या शाळा खोलीत शिकले ती इमारत आता नादुरुस्त झाल्याने येथे शासनाने निधी मंजूर करून दोन खोल्या स्लबच्या (आरसीसीच्या) बांधण्यात याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मुख्याध्यापक सुनिल काकडे हे ९ वर्षापासून या शाळेत आहेत ते अनिल बेद्रे सर हे दोन वर्षापासून येथे कार्यरत आहेत. भवरवाडीची प्राथमिक शाळा




ही मोत्यांच्या अक्षराची शाळा असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सुंदर हस्ताक्षरासाठी विशेष परिश्रम दोन्ही ही शिक्षकांनी विद्याथ्यर्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. अधिकचा एक तास दिल्याने सर्वच विद्यार्थ्यांचे जवळपास हस्ताक्षर सुंदर झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात अव्वल भवरवाडी येथील जिल्हा परिषदेची शाळा ही तशी छोटी आहे.पण गुणवत्ते बरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ही उत्स्फूर्त भाग घेतात. याचाच परिपाक म्हणून दरवर्षी होणारे स्नेहसंमेलन हे त्यांच्या कलागुणांची सादरीकरणातील उत्कृष्ट कलाकृती होत असून सांस्कृतिक कार्यक्रमाचा एक वेगळा ठसा या परिसरात या शाळेने उमटविलेला आहे.

गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी या शाळेत मिशन जरेवडी अंतर्गत वाचन लेखन उपक्रमांतर्गत विद्यार्थी घडावेत या दृष्टीने सुंदर हस्ताक्षर उपक्रम राबवण्यात येत आहे.आज भवरवडी शाळेत मुलांचे अक्षर खूप सुंदर मोत्यासारखे झाले आहेत.या शाळेसाठी सरपंच भरत भवर, ग्रा पं सदस्य रमेश भवर, हनुमंत मोरे,गणपत भवर,जालिंदर भवर,ज्ञानदेव बागल, पोपट भवर, सदाशिव भवर, विठ्ठल शिनगिरे, बबन भवर, वैजनाथ भवर, रामा भवर, संतोष मोरे, संतोष भवर,बन्सी भवर, प्रशांत भवर, महेश भवर व आदी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

---

# नागपंचमीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी एकत्रित येऊ : आमदार सत्यजित देशमुख

## शिराळा एसटी आगारात नवीन दहा बसेसचा लोकार्पण सोहळा संपन्न



शिराळा एसटी आगारामध्ये नवीन दहा बसेसचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला यावेळी आमदार सत्यजित देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, आमदार सदाभाऊ खोत, युवा नेते सम्राट महाडिक आदी.

**शिराळा | प्रतिनिधी**

शिराळा एसटी आगारामध्ये पुढील काळात आणखी गाड्या आणण्यासाठी प्रयत्नशील असून शिराळा येथील जगप्रसिद्ध नागपंचमीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊ नक्कीच यश मिळवू असे प्रतिपादन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले ते शिराळा एसटी आगारामध्ये नवीन दहा बसेसच्या लोकार्पण सोहळ्यामध्ये बोलत होते.

यावेळी आमदार सत्यजित देशमुख, आमदार सदाभाऊ खोत, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, युवा नेते सम्राट महाडिक, माजी सभापती ॲड भगतसिंग नाईक, माजी जिल्हा परिषद सदस्य संपतराव देशमुख, माजी सभापती हणमंतराव पाटील, सुखदेव पाटील, रणजितसिंह नाईक, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष

केदार नलवडे, विश्वप्रतापसिंग नाईक, संतोष भोकरे, घनःश्याम पाटील, शहराध्यक्ष कुलदीप निकम, डॉ शैलेश माने, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष जयसिंगराव शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी आमदार सत्यजित देशमुख म्हणाले, शिराळा आगारामध्ये पुढील काळात आणखी गाड्या आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. १९८८ साली माजी सभापती शिवाजीराव देशमुख यांनी आगाराची स्थापना केली आहे. कै शिवाजीराव देशमुख व शिवाजीराव नाईक यांनी दुरदृष्टीसमोर ठेवून या आगाराची स्थापना केली आहे. आगार प्रमुखांनी वाहक व चालक यांची संख्या वाढवावी. या तालुक्यातील छोट्या छोट्या वाड्यावस्त्यांपर्यंत एसटी पोहचली पाहिजे. यासाठी मीनी बसची व्यवस्था करणारं आहे. अंतर्गत वाहनांचे सहनियोजन करावे. ग्राहकांच्या सोयीसाठी गाड्या वेळेत सुटाव्यात. आगामी काळात एसटी आगारामध्ये स्वच्छ पाण्यासाठी आरवोची व्यवस्था करणारं आहे, योग्य व्यवस्थापन केल्यास लाल परी प्रचंड वेगाने धावणार आहे. एसटीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव नाईक, आमदार सदाभाऊ खोत व भाजपचे नेते सम्राट महाडिक यांना इथुन पुढील काळात आपणं एकत्रित येऊन शिराळच्या जगप्रसिद्ध नागपंचमीला गतवैभव प्राप्त करून देऊया, आणि शिराळा विधानसभा मतदारसंघास आपणं सर्वांनी अग्रेसर करुया असे आवाहन केले.

तर माजी मंत्री शिवाजीराव नाईक म्हणाले, तालुक्याच्या दृष्टीने आजचा दिवस आनंदाचा आहे. माजी सभापती कै. शिवाजीराव देशमुख यांच्या प्रयत्नामुळे शिराळा आगाराची स्थापना झाली. पुढील काळात डोंगरी विभागासाठी मीनी बसची सोय होणार आहे. महिलांना, मुलींना व विद्यार्थ्यांना एसटी बसमध्ये सवलती आहेत. शिराळा डेपोने अनेक फेऱ्या दुसऱ्याला डेपोला दिल्या आहेत त्या परत घ्यावेत. कर्मचार्यांची संख्या वाढवण्यावण्याठी आमदार सत्यजित देशमुख व आमदार सदाभाऊ खोत यांनी प्रयत्न करावेत. आगारामध्ये कॅन्टीन, पिण्याचे शुद्ध पाण्याची सोय व्हावी. शिराळा एसटी आगारामध्ये अनेक वर्षांपासून मागणी होती की नवीन एसटी बस मिळाव्यात त्या मागणीला आमदार सत्यजित देशमुख यांनी यश मिळवून दिले.

आमदार सदाभाऊ खोत म्हणाले की, आमदार सत्यजित देशमुख यांनी पाठपुरावा करून सांगली जिल्ह्यात शंभर गाड्या मिळणार आहे. यामधील पहील्या दहा गाड्यांचा लॉट शिराळा आगारास मिळवून दिला आहे. आगारामध्ये चालक व वाहक ही एसटीची दोन चाकं आहेत. ऐतिहासिक पगारवाढ देण्याचं काम आम्ही केलं आहे. पाच वर्ष जर पारदर्शक कामं केलं तर एसटी आगारासारखा फायदा नाही. परंतु वरिष्ठ पातळीवर ज्याला लुबाडता येईल तो लुबाडत चालला आहे. याचा फटका तळागाळातील कर्मचाऱ्यांना भोगावा लागत आहे. एसटी मधील भ्रष्टाचार हटवण्याची गरज आहे. स्पर्धेच युग आहे त्यामुळे

भविष्य काळात काळानुरूप बदल करावे लागतील. यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

तसेच सम्राट महाडिक म्हणाले की, एसटी आगारामध्ये बसेसची कमतरता असल्याने शिराळा तालुक्यातून वाळवा तालुक्यात येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत होते. अनेक विद्यार्थी याबाबत भेटून तक्रारी करत होते. आमदार सत्यजित देशमुख यांनी आज नवीन दहा गाड्या शिराळा आगारास उपलब्ध करून दिल्या आहेत.तर

शिराळा हा डोंगरी तालुका आहे इथं मीनी बसची व्यवस्था होणे गरजेचे आहे. या मतदारसंघात जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी आम्ही सर्वजण सदैव प्रयत्नशील राहणार आहे.

स्वागत व प्रास्ताविक धन्वंतरी ताटे यांनी केले तर संभाजी नलवडे, कैलास देसाई यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास केडी पाटील, विजय महाडिक, सम्राट शिंदे, बंटी नांगरे पाटील, अनिता धस, विद्याताई कुलकर्णी, बसवेश्वर शेटे, प्रतापराव यादव, स्त्री रोग तज्ञ योगीता माने, कैलास देसाई, बाळासाहेब पाटील सत्यजित कदम आदी उपस्थित होते.

---

# सहा लाखाचा धनादेश अनादर झालेल्या प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

**कडा । प्रतिनिधी**

मौजे पिंपरखेड ता. आष्टी जि. बीड येथील फिर्यादी मारुती निवृत्ती लाड यांनी आष्टी येथील मा. न्यायालयात धनादेश अनादर झाल्या प्रकरणी एन. आय ॲक्ट 138 प्रमाणे मौजे देवळाली येथील आरोपी मधुकर माणिक बडे याचे विरुद्ध फिर्याद दाखल केली होती. त्या प्रकरणात आष्टी येथील मे. न्यायालय एम. के. पाटील यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.



या प्रकरणातील सविस्तर माहिती अशी कि, फिर्यादीने आरोपी सोबत सहकारी साखर कारखान्यास वीस पुरुष आणि महिला पुरवण्यासाठी करार केला होता. सदर करारामध्ये आरोपीने फिर्यादीस वीस पुरुष व महिला कामगार पुरवण्याच्या बदल्यात फिर्यादीने आरोपीस रक्कम रुपये सहा लाख वीस हजार रुपये दिल्याचे सदर जरामध्ये नमूद केले होते. परंतु सहकारी साखर कारखान्यास फिर्यादीस आरोपीने मजूर पुरविले नाही. त्यामुळे आरोपीने दि 28/11/2011 रोजी रक्कम रुपये तीन लाख रुपयाचा धनादेश क्रमांक 501341तसेच दुसरा धनादेश क्रमांक 501342 रक्कम रुपये तीन लाख असे एकूण रक्कम रुपये सहा लाख रुपयाचे दोन धनादेश दिले व उर्वरित रक्कम रुपये वीस हजार रोख स्वरूपात दिले. सदर चे धनादेश भारतीय स्टेट बँक शाखा कडा ता. आष्टी या बँकेत जमा केले असता न वटता फिर्यादीस परत मिळाले त्यामुळे फिर्यादीने आरोपी विरुद्ध एन. आय. ॲक्ट 138 प्रमाणे फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकणात फिर्यादीच्या वतीने एक साक्षीदार तपासन्यात आला. तसेच आरोपीच्या वतीने तीन साक्षीदार तपासन्यात आले. आरोपीच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धारित आरोपी नामे मधुकर माणिक बडे रा. देवळाली ता. आष्टी जि. बीड यांची रक्कम रुपये सहा लाख धनादेश अनादर प्रकरणी आष्टी येथील मे. न्यायाधीश एम. के. पाटील यांनी दि 24 /3/ 2025 रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड किशोर बीभीषन श्रीखंडे यांनी काम पहिले.त्यांना सहकार्य ॲड उद्धव बाबासाहेब पोकळे यांनी केले. त्यांचे अभिनंदन वकील संघांचे उपाध्यक्ष ॲड किशोर निकाळजे, वकील संघातील सर्व सदस्य यांनी अभिनंदन केले.

---

# स्टोन क्रेशर पासून होणाऱ्या नुकसानीसाठी शेतकऱ्याचे तहसील समोर आमरण उपोषण

**किल्ले धारूर- प्रतिनिधी**

किल्ले धारूर येथील सुधाकर जोतिबा खामकर यांची गट नंबर 277/2 मध्ये 01 हेक्टर आर. जमीन असून ती जमीन वहीतिची आहे परंतु रामेश्वर मोहन खामकर यास मौजे धारूर येथील स.न.277/1 मध्ये खडी क्रेशर नसून तेथे खदान आहे तसेच रामेश्वर मोहन खामकर याने शासनाची दिशाभूल करून तसेच बनावट खोटे कागदपत्र तयार करून सुधाकर जोतिबा खामकर यांची स.न.275/2 मध्ये रामेश्वर मोहन खामकर यांची कसल्याही प्रकारची जमीन नसताना विनाकारण खोडसाळपणाने सुधाकर ज्योतिबा खामकर यांच्या जमिनीत त्यांनी खडी केशर टाकलेले आहे त्या खडी केशर मधून निघणारी धूळ डस्ट हे सुधाकर ज्योतिबा खामकर यांच्या शेतामधील पिकावर जात असल्यामुळे त्यांच्या पिकांची होणारी वाढ या धुळी मुळे खुंटलेली असून त्यांचे यामुळे मोठ्या प्रमाणात अतोनात आर्थिक नुकसान होत आहे.




याविषयी सुधाकर ज्योतिबा खामकर यांनी सदर खडी क्रेशर मुळे होत असलेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळावी व सदर स्टोन क्रेशर मुळे होणाऱ्या नुकसानीला सदर स्टोन क्रेशर मालक जबाबदार आहे.

# राका येथे विशेष ग्रामसभा घेण्याची मागणी

**गोंदिया | प्रतिनिधी**

सडक अर्जुनी.| राका येथे अवैधरित्या देशी दारू विक्रीचा व्यवसाय सुरू असून तो कायमस्वरूपी बंद करण्याकरिता विशेष ग्रामसभा घेण्याबाबदचे निवेदन शिवजयंती उत्सव समिती व गावकरी यांच्या वतीने १ एप्रिल २०२५ ला सरपंच व सचिव ग्रामपंचायत राका यांना देण्यात आले आहे.

राका येथे गेल्या चार-पाच वर्षांपासून अवैधरीत्या दारु विक्रीचा व्यवसाय गावामध्ये सुरु असून गावातील नागरिकांना व नवीन पिढीला या दारु विक्रीचा अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. गावामध्येच दारु मिळत असल्यामुळे दररोज झगडे -भांडणे, आपआपसात वाद-विवाद वाढणे सुरु आहे. गावातील शांतता सुव्यवस्थेचा भंग निर्माण होत असून नागरिकांना या व्यवसायाचा अतिशय त्रास सहन करावा लागत आहे.भविष्याच्या दृष्टिकोनातून तरुण पिढी या व्यसनाच्या अधीन राहून बळी पडू नये. या सर्व बाबींचा विचार करुन राका गावात विशेष ग्रामसभा घेऊन लवकरात लवकर या अवैधरीत्या दारु विक्री व्यवसायावर बंदी घालावी अशी मागणी प्रेमदास चांदेवार, युवराज मेंढे,हितेश मेंढे, पारस बहेकार, अरविंद मेंढे, आदी व इतर तसेच शिवजयंती उत्सव समिती व गावाकऱ्यांनी केली आहे.

---

# सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेजमध्ये पदवीप्रदान सोहळा उत्साहात साजरा

**परळी | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील अल्पावधीतच नावारूपास आलेल्या सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या प्रि-प्रायमरी विभागातील युकेजी वर्गातील विद्यार्थ्यांचा "पदवीप्रदान सोहळा" अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात शनिवार दि.२९ मार्च रोजी शाळेच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडला. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. गोविंदराव मुंडे, सचिव सौ. प्रियतमा मुंडे आणि प्राचार्य श्री. प्रदीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. पाहुण्यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर यूकेजी वर्गातील पदवीधर कु. वाघमारे आरोही, चि. चौधरी अजांत, चि. वैराळ सागर, चि. आंधळे राजदीप, चि. फड आदित्य तसेच एलकेजी वर्गातील चि.जयराम रघुवीर, चि.मोरे






आरव, चि.तिडके शौर्य यांनी "माझी शाळा", "माझे शिक्षक" याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. प्रि प्रायमरीच्या विभागप्रमुख जोशी पद्मा मॅडम यांनी या बालवर्गासाठी घेतल्या जाणाऱ्या विविध संस्कारक्षम उपक्रमांची थोडक्यात महिती दिली. संस्था सचिव सौ. प्रियतमा मॅडम यांनी या पदवीप्राप्त विद्यार्थ्यांच्या उपस्थित पालकांना मुलांच्या बालसंस्कारक्षम वयातील अध्ययनाचे महत्व सांगुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छया दिल्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाळेचे प्राचार्य प्रदिप जाधव यांनी शाळेच्या आगामी काळातील राबवल्या जाणाऱ्या अध्यापन पद्धतीची पालकांना महिती दिली व पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छया दिल्या. सर्व पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले व खाऊचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता पालकांच्या रंगतदार अशा विविध स्पर्धांनी झाली. पालकांनीही यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून आनंद घेत बक्षिसांची लूट केली. तसेच अनेक पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळा व शिक्षक यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन शाळेचेही आभार मानले. या समारंभासाठी प्रि- प्रायमरीतील पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा बिडवे मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन शिल्पा गित्ते मॅडम यांनी मानले.

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड, बुधवार, दि. 2 एप्रिल 2025

LAST PAGE



या जागेवर जाहिरात स्विकारली जाईल जाहिरातीसाठी संपर्क करा मो. 8446447777


# कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:चीच दुकाने थाटली?

## निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा शेतकऱ्यांच्या माथी मारल्याने शेतकरी संकटात आ .सुरेश धस यांचा गंभीर आरोप

**आष्टी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे नातेवाईक आणि मित्रांच्या नावे कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्र सुरू केली असून या जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती आपण मागितली असून या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करणार आहोत अधिकाऱ्यांनी स्वत:च्याच कंपन्या स्थापन करून निकृष्ट दर्जाच्या निमित्त शेतकऱ्यांच्या माती मारल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली मात्र अधिकारी मालामाल होण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करणार आहोत असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले,महाराष्ट्रील कृषि क्षेत्र वरचेवर संकटात असल्याने महाराष्ट्रील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहे. शेतकरी आत्महत्या करण्याच्या पाठीमागे निकृष्ठ दर्जाची खते, बियाणे, औषधे आणि किटकनाशाके, सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रजैवके (PGR), PROM इत्यादीचा पुरवठा कंपन्या व कृषि विभागातील अधिकारी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. तसेच कंपन्या निरनिराळे प्रलोभने देऊन शेतकऱ्यांना मुख्य खते (युरीया, डीएपी इत्यादी) सोबत लिंकिंग मध्ये ही निकृष्ठ दर्जाची खते घेण्यास भाग पडत आहेत. त्यासाठी गाव पातळीवरील कृषि निविष्ठा विक्री केंद्रे व कंपनी पातळीवरील विक्री काम पाहणारे किंवा उत्पादन केलेला माल खपविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि शेतकरी कर्ज काढून उत्पन्न जास्त यईल या आशेने या निविष्ठा घेत आहेत, गेल्या १० वर्षा पासून चढत्या क्रमाने बोगस खते, बियाणे, औषधे उत्पदान करणाऱ्या कंपन्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचा उत्पादन खर्च वाढत आहे. हवामान व पावसाचे अनिश्चिततेमुळे अपेक्षित उत्पादन शेतीमधून मिळत नाही उत्पन्न आल्यानंतर त्याचा बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढू लागलेले आहे ही एक वस्तुस्थिती आहे.

निकृष्ट दर्जाच्या या खते बियाणे औषधे आणि निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर योग्य दर्जा आणि गुणवत्ता पूर्ण निविष्ठा उत्पादन होणार आहे याचे नियंत्रण करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. एका जिल्ह्यामध्ये कृषी विभागामार्फत गुणनियंत्रणाच्या कामासाठी प्रत्येक तालुक्याला कार्यरत असणारे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, उपविभागीय पातळीवर उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक व पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील मोहीम अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, विभागीय तंत्र अधिकारी गुन नियंत्रण इत्यादी अधिकारी कर्मचारी काम करीत आहेत.

साधारणपणे आमच्या बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. त्यामध्ये ११ तालुका कृषी अधिकारी, ११ पंचायत समितीचे कृषी अधिकारी, ३ उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, त्यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक आणि पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक असे मिळून सुमारे ३० एकट्या बीड जिल्ह्यात क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहेत. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील तंत्र अधिकारी गुणनियंत्रण, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सुद्धा क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर आहेत.

या सर्वांनी बदली करीता मंत्री कार्यालयात मोठ्या प्रमाणात रकमा देऊन बदली करून घेतली



या सगळ्या अधिकाऱ्यांनी प्रचंड भ्रष्टाचार करून कित्येक कंपन्यांसोबत भागीदारी करून निकृष्ठ निविष्ठांच्या नावावर कित्येक कोटी रुपये भ्रष्टाचारी मार्गाने कमविले आहेत. एकट्या किरण जाधव च्या काळात हजारो परवाने साताऱ्या जिल्ह्यात वाटप केले आहेत. त्यात निविष्ठा उत्पादन, निविष्ठा विक्री केंद्रे यांचा समावेश आहे. त्यात स्वतः किरण जाधव जाधव यांचे मित्र आणि नातेवाईक यांचा समावेश आहे. आता किरण जाधव सध्या महाराष्ट्र राज्याच्या दक्षता पथकाचे प्रमुख म्हणून काम करत आहे. दक्षता पथकात गेल्यावर सुद्धा किरण जाधवने सहा महिन्यात ५ कोटी रुपयांचा कलेक्शन केलेले आहे. किरण जाधव नावाच्या या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याने गुणनियंत्रण विभाग पोखरून काढलेला या भ्रष्टाचारी लोकांनी मंत्र्यापासून तालुका कृषी अधिकाऱ्यापर्यंत टक्केवारी देऊन यांच्या बोगस कंपनीत उत्पादित होणाऱ्या बोगस निविष्ठा वाटप करून त्यातून कोट्यावधी रुपये कमवितात. या सर्व लोकांची बँक स्टेटमेंट ची माहिती घेतल्यास यांचा सगळा भ्रष्टाचारी मार्गाने कमवलेला काळा पैसा उघड होईल.

असल्याने ३ वर्षात १० पट रक्कम वसूल करण्याचा हेतूने हे सर्व क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर स्वतःचे काम सोडून आणि शेतकऱ्याला गुणवत्ता पूर्ण निविष्ठा पुरवठा करण्यासाठी निरीक्षण करण्याचे सोडून हप्ते गोळा करण्यामध्ये गुंतलेले असतात. विक्री केंद्रे तपासणीला गेल्यावर तपासणी फी, नमुना काढल्यास त्याची फी वेगळी असते, या सर्व हप्तेखोरपणामुळे कृषी निविष्ठा विक्री केंद्राचे मालक शेतकऱ्याला देण्यात येणाऱ्या निविष्ठाच्या किमतीपेक्षा जास्तीचे कमिशन (४०% ते ५०%) मिळविण्याच्या हेतूने बोगस कंपन्यांचा माल खपविण्याकडे त्यांचा कल जास्त असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण निविष्ठा मिळत नाहीत.

याबाबत मी माहिती घेतली असता बहुतांश अधिकारी म्हणजेच संचालकापासून ते जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकापर्यंत या अधिकाऱ्यांचे बोगस निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये त्यांचा वाटा आहे किंवा त्याच्या रक्तातले नातेवाईक म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून त्या कंपन्यांमधला माल याच कृषी विक्री केंद्रांस घेण्यास दबाव आणतात व मोठ्या कंपन्यांच्या गुणवत्ता पूर्ण निविष्ठासोवत या बोगस निविष्ठा लिंकिंग मध्ये विकण्याची बळजबरी केली जाते.

खात्यातील अधिकाऱ्यांनीच कंपन्या सुरू केलेल्या असल्यामुळे, या कंपन्यांमार्फत उत्पादित झालेल्या खते, बियाणे, औषधे, कीटकनाशके इत्यादींचे नमुने काढले जात नाहीत. कृषि निविष्ठा विक्री केंद्रांना अधिकाऱ्यांच्या अप्रत्यक्षरीत्या मालकीच्या असणाऱ्या कंपन्या मार्फतच उत्पादित झालेल्या निविष्ठांचा माल विकत घेण्यासाठी जबरदस्ती केली जाते.

कोल्हापूर संभागातील विभागीय कृषि सहसंचालक उमेश पाटील यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलाच्या नावे कृषि सेवा बायो ऑरगॅनिक फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड या नावाची कंपनी स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील माझ्याकडे मंत्रालयातून आलेल्या तक्रारीतून महाराष्ट्रातून परवाना घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपनीकडून कलेक्शन किरण जाधव कडे केले जात असल्याचे समजले किरण जाधव याने तंत्र अधिकारी निविष्ठा व गुणनियंत्रण विभागात गेल्या १५ वर्षा पेक्षा जास्त काळ गुणनियंत्रण विभागातच काम केले आहे.

कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी स्वतःच खते, बियाणे आणि कीटकनाशके यासारख्या कृषी उत्पादनांशी संबंधित कंपन्या स्थापन करून चालवत असल्याचे उघड झाले आहे. पुण्यात हडपसर, वडकी नाला तसेच परिसरात तसेच नाशिक मधील एमआयडीसी, औरंगाबाद एमआयडीसी, ठाणे जेएनपीटी चा जवळचा एरिया मध्ये अधिकाऱ्यांनी गोडाऊन बांधलेली आहेत. हीच गोडाऊन ते २० ते ३० रुपये स्क्वेअर फिटने भाड्याने देत आहेत. स्वतःचे गोडाऊन मध्ये या बोगस कंपन्यांचा माल साठवून विक्री करत आहेत. अशा प्रकारच्या कृत्यांमुळे केवळ कृषी विभागाची प्रतिष्ठा डागाळली जात नाही, तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे आणि भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत आहे. या प्रकरणात 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग कायदा, २००२ (PMLA)* अंतर्गत हे अधिकारी आणि कर्मचारी दोषी ठरूतात, कारण काळा पैसा यात गुंतवला आहे. त्याला शासनाची मंजुरी घेतलेली नाही. सरकारी खरेदी प्रक्रियेत स्वतःच्या कंपन्यांना प्राधान्य देण्यासाठी नियमांचे उल्लंघन केले जाते. शेतकऱ्यांसाठी असलेली सबसिडी स्वतःच्या कंपन्यांना मिळवून देण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर होतो, स्वतःच्या कंपन्यांमार्फत निकृष्ट दर्जाची खते, बियाणे आणि औषधे शेतकऱ्यांना पुरवून त्यांचे नुकसान करणे, या व्यवसायातून मिळणारा नफा हा कायदेशीर मार्गाने दाखवला जात नाही, तर तो काळ्या पैशाच्या स्वरूपात जमा केला जातो.

कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या नावाने असणाऱ्या कंपन्यांचा तपशील असा आहे की किरण शामराव जाधव कृषी आयुक्तालयात तंत्र अधिकारी गुणनियंत्रण ७- ८ मध्ये ज्या खत उत्पादक कंपन्यांना परवाने दिलेले आहेत व परवान्यांना नूतनीकरण दिलेले आहे. त्या सर्व कंपन्यांचे प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक लेखा परीक्षण करण्यात यावे.

उल्लेख केलेल्या कंपन्यांची व विक्री केंद्रांची तपासणी आयकर विभागामार्फत सखोल तपासण्या करण्यात याव्या व या अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी उघड चौकशी महासंचालक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मार्फत करण्यात यावी.

किरण जाधव यांना पुन्हा पुन्हा गुन्हा नियंत्रण विभागातच कशी पदस्थापना देण्यात आली याची देखील सखोल चौकशी करण्यात यावी.

किरण जाधव कार्यरत असताना त्यांचे नियंत्रण अधिकारी दिलीप झेंडे व विकास पाटील हे जरी सेवानिवृत्त झाले आले तरी. त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची सुद्धा उघड चौकशी लाच लचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात यावी.महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे खते बियाणे औषधे व इतर कृषी निवेष्ठांचे पुरवठादार यांच्या गेल्या १५ वर्षातील आर्थिक व्यवहाराची तपासणी आयकर विभागामार्फत करण्यात यावी अशी मागणी ही त्यांनी शेवटी केली.

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस मार्च 2025 अखेर 6 कोटी 62 लक्ष रुपयांचा करपूर्व नफा

## वर्ष अखेर ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत ०% नेट एन पी ए राखण्यात बँकेस यश

**अंबाजोगाई (प्रतिनिधी )**



अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२४-२०२५ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत वर्षाखेरीस ०% नेट एन पी ए राखण्यात यश मिळवले आहे. त्याबरोबरच मार्च २०२५ अखेरीस बँकेस ६ कोटी ६२ लक्ष एवढा करपूर्व नफा मिळवल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. बँकेने मिळवलेले हे यश बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, ग्राहक तसेच सभासदाच्या विश्वास व सहकार्याच्या भावणेमुळेच शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे.

मार्च २०२५ अखेर बँकेची एकूण सभासद संख्या १२५८६ एवढी असून बँकेकडे ५७३ कोटीच्या ठेवी जमा झाल्या आहेत. त्याच्या बळावरच बँकेच्या सभासद तथा ग्राहक बांधवाना मार्च २०२५ अखेर रु.३३० कोटी इतके कर्जवाटप केले आहे. या आर्थिक वर्षाचे रु.१९ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रु.५० कोटी एवढा आहे. त्याचबरोबर वर्ष अखेरीस बँकेने एकूण रु. २९० कोटी एवढी गुंतवणूक केली आहे . ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने एकूण ठेवी रु. ५७३ कोटी इतक्या जमा केलेल्या आहेत . गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २३ कोटी रुपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. बँकेस ३१मार्च २०२५ अखेर रु. ६ कोटी ६२ लक्ष इतका करपूर्व नफा मिळवला आहे. सर्व क्षेत्रातील आर्थिक परिस्थिती पाहता बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी , कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी प्रसिध्दी पत्राद्वारे सांगितले आहे . मार्च २०२५ अखेरील बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची पावती असल्याचे देखील मोदी यांनी नमूद केले आहे. चालु आर्थिक वर्षात अनंत अडचणी येऊनही बँकेच्या वसुली विभागाने समाधानकारक काम करत बँकेचा निव्वळ एनपीए ०% राखण्यात बँकेने यश मिळवले आहे .

देशातील आर्थिक परिस्थिती वाढती महागाई, बेरोजगारी अशा अवघड परिस्थिती देखील कर्जधारक , ग्राहकांचा विचार करुन बँकेने सुरळीत आर्थिक व्यवहार करत बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले आहे असे मत बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. बँकेचे सर्व सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे सन २०२४ - २०२५ मध्ये चांगले कामकाज करणे शक्य झाले आहे. अशीच कामगिरी पुढील आर्थिक वर्षातही कायम ठेवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल अशी ग्वाही अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे .

१९९६ साली केवळ एका शाखेद्वारे अतिशय अल्प अशा भांडवलावर सुरू झालेली अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक आज ५७३ कोटीच्या ठेवीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या बीड, लातूर, धारशिव, छत्रपती संभाजी नगर, पुणे अहिल्यानगर या जिल्ह्यात २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत आहे. नुकतीच भारतीय रिझर्व्ह बँकेने केज, मुरुड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन तीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या सर्व नियमांच्या आधीन राहूनच अंबाजोगाई पिपल्स बँकेने आजपर्यंत सर्व आर्थिक व्यवहार करत आहे.

या कामगिरीच्या बळावरच रिझर्व्ह बँकेने नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिल्याचे मोदी यांनी या पत्रकात नमूद केले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँक अर्थकारण करत करतच अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबिर याबरोबरच महिलांसाठी बँकिंग प्रशिक्षण शिबिर, विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात बँक अग्रस्थानी असते.या व अशा इतर अनेक कारणांमुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली असल्याचे समाधान बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले आहे .यापुढेही बँकेचे सन्माननीय संचालक प्रा वसंत चव्हाण, ऍड विष्णुपंत सोळंके, अरुण काळे,पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी,ऍड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडुभाई शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा,हर्षवर्धन वाडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ स्नेहा हिवरेकर, प्रा. लक्ष्मण दासूद , सचिन बेंबडे यांच्या सहकार्याने अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

# श्री वेदामृत पंचकर्म आयुर्वेद क्लिनिकचे मुर्शदपूर आष्टी येथे भव्य उद्घाटन

**आष्टी |प्रतिनिधी**



गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आष्टी शहरातील मुर्शदपुर भागात डॉक्टर सौ .अंकिता गर्जे (एम . डी . पंचकर्म ) आणि डॉ केतन गर्जे (एम एस सर्जरी )यांच्या सर्व सुविधांनी युक्त अशा अद्ययावत पंचकर्म क्लिनिकचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या क्लिनिकमध्ये आधुनिक पद्धतीने पंचकर्म चिकित्सा केली जाणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास मुर्शदपुर भागातील मान्यवर मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ केतन गर्जे आणि डॉ . सौ . अंकीता गर्जे यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि पंचकर्म उपचार पद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले.

या पंचकर्म क्लिनिकमध्ये वमन, विरेचन, बस्ती, नस्य, शिरोधारा, स्नेहन, स्वेदन इत्यादी आयुर्वेदिक उपचार उपलब्ध होणारआहेत. पंचकर्म चिकित्सा ही शरीरातील दोष दूर करून शरीर शुद्ध करण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. ही चिकित्सा संधिवात (अर्थरायटिस), आमवात, पाठदुखी, संधिदुखी, अन्नपचन समस्या, त्वचा विकार, तणाव, मानसिक तणाव, निद्रानाश, वजन वाढणे किंवा कमी होणे, श्वसनाचे विकार , जुनाट ताप , जुनाट सर्दी ,रक्तदाबाचे विकार तसेच सर्व आजारांवर उपयुक्त ठरते.

या सुविधांमुळे आष्टी आणि परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि प्रभावी पंचकर्म उपचार मिळणार असून, आरोग्य क्षेत्रात हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# परभणीत वंचित बहुजन आघाडीच्यावतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**परभणी प्रतिनिधी | आशिष मुंढे**

परभणी : जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे, ज्यामुळे गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत, हीच बाब लक्षात घेत परभणी शहरातील वंचित बहुजन युवा आघाडीचे कोषाध्यक्ष मिलिंद खंदारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मा. जिल्हा उपाध्यक्ष संदीप खाडे, गौरव कुमार तारू ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत हे भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालय येथील डॉ.संकेत वाघ, सामाजिक कार्यकर्ते आत्माराम जटाळे, विजय नंद, मिकुल मेकव्वान, विठ्ठल शिंदे आदी उपस्थित होते. तसेच हे शिबिर संपन्न होण्याकरिता मुंजा ढगे, सिद्धार्थ इंगोले, विष्णू कापसे, सिद्धार्थ खंदारे, बुद्धपाल कांबळे, भीमा निसर्गाध, रोहन कापुरे, रवी काकडा, धनंजय धबाले, राहुल धबाले, अरबाज खान, राहुल येडे, शेख आसेब यांनी परिश्रम घेतले.

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर

**प्रतिनिधी । बीड**

व्हॉईस ऑफ मीडियाकडून बीड जिल्ह्यातील विविध तालुकाध्यक्ष आणि तालुका कार्याध्यक्षांच्या निवडी जिल्हाध्यक्ष जालींदर धांडे यांच्याकडून आज एक एप्रिल रोजी जाहीर करण्यात आल्या.

यामध्ये गेवराईचे तालुकाध्यक्ष म्हणून विनोद पौळ, कार्याध्यक्ष म्हणून राजेश राजगुरू, माजलगावचे तालुकाध्यक्ष वैजेनाथ घायतिडक तर कार्याध्यक्ष म्हणून गणेश काटकर, परळीचे तालुकाध्यक्ष महादेव शिंदे तर कार्याध्यक्ष श्रीराम लांडगे, बीडचे तालुकाध्यक्ष अशोक शिंदे तर कार्याध्यक्ष सुरेश रोकडे, शिरूर तालुकाध्यक्ष अशोक शिंदे, तर कार्याध्यक्ष राजेश्वर क्षीरसागराळे, आष्टी तालुकाध्यक्ष अनिरूध्द धर्माधिकारी तर कार्याध्यक्ष भाऊसाहेब गाडे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष म्हणून अतुल जाधव तर कार्याध्यक्ष म्हणून देवीदास जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनिर्वाचित सर्व तालुकाध्यक्ष व कार्याध्यक्षांच्या नियुक्तीबद्दल जालींदर धांडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.


दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)